R.No.MAHMAR/25/A3029

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# दैनिक महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक १०७ बुधवार दि.०५ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

# राज्यात वाजले निवडणुकीचे बिगुल! २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर



महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची वाट पाहणाऱ्या नागरिकांसाठी आज एक मोठी बातमी आहे! राज्य निवडणूक आयोगाने आज (मंगळवारी) पत्रकार परिषद घेऊन नगर परिषद (Nagar Parishad) आणि नगर पंचायत (Nagar Panchayat) निवडणुका जाहीर केल्या आहेत. आयोगाने राज्यातील एकूण २४६ नगर परिषदा आणि ४२ नगर पंचायतींच्या निवडणुकीची अधिकृत घोषणा केली आहे. या घोषणेमुळे राज्यात राजकीय हालचालींना वेग येणार आहे. आयोगाच्या या महत्त्वपूर्ण घोषणेमुळे राज्यातील एकूण १ कोटी ७ लाख ३० हजार ५७६ मतदार आता मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सज्ज होणार आहेत. आयोगाने जाहीर केलेल्या तपशीलानुसार या निवडणुकांमध्ये एकूण ६,८५९ सदस्यांची आणि २८८ अध्यक्षांची निवड केली जाईल. राज्यातील २४६ नगर परिषदांमध्ये निवडणुका होणार असून यात १० नवीन नगर परिषदांचा समावेश आहे. तसेच राज्यातील एकूण १४७ नगरपंचायतींपैकी ४२ नगरपंचायतींसाठी निवडणूक होत असून यात १५ नवनिर्मित नगरपंचायतींचा समावेश आहे. नगरपंचायत, नगर परिषद निवडणुकीच्या तारखा नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची तारीख – १० नोव्हेंबर २०२५ नामनिर्देशनाची अंतिम मुदत – १७ नोव्हेंबर २०२५ अर्जांची छाननी – १८ नोव्हेंबर २०२५ अर्ज माघारी घेण्याची तारीख – २१ नोव्हेंबर २०२५ निवडणूक चिन्ह वाटप – २६ नोव्हेबर २०२५ मतदानाचा दिवस: २ डिसेंबर २०२५ मतमोजणीचा दिवस : ३ डिसेंबर २०२५

मतदार आणि मतदान केंद्रे राज्यात एकूण १७,०३,५७६ मतदार मतदान करतील पुरुष मतदार – ५३,७९,९३१ महिला मतदार – ५३,२२,८७० इतर – ७७५ एकूण १३,३५५ मतदान केंद्रे उभारली जातील मतदारसंघ आणि आकडेवारी एकूण २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपरिषदांमधील निवडणुका एकूण ३८२० विभाग आणि ६८५१ जागा महिलांसाठी राखीव: ३४९२ जागा अनुसूचित जाती: ८९५ जागा अनुसूचित जमाती: ३३८ जागा ओबीसी प्रवर्ग: १८२१ जागा विभागनिहाय निवडणुका कोकण विभाग: २७ नगरपंचायत नाशिक विभाग: ४९ नगरपंचायत पुणे विभाग: ६० नगरपंचायत छत्रपती संभाजीनगर विभाग: ५२ नगरपंचायत अमरावती विभाग: ४५ नगरपंचायत नागपूर विभाग: ५५ नगरपंचायत उमेदवारांसाठी खर्च मर्यादा राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक खर्च मर्यादा वाढवली आहे. 'अ' वर्ग नगरपरिषद: अध्यक्ष १५ लाख रुपये, सदस्य ५ लाख रुपये 'ब' वर्ग नगरपरिषद: अध्यक्ष ११.२५ लाख रुपये, सदस्य ३.५ लाख रुपये 'क' वर्ग नगरपरिषद: अध्यक्ष ७.५ लाख रुपये, सदस्य २.५ लाख रुपये नगर पंचायत: अध्यक्ष ६ लाख रुपये, सदस्य २.२५ लाख रुपये आचारसंहिता लागू निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर होताच संबंधित भागात आचारसंहिता लागू झाली आहे. या भागात कोणत्याही नवीन योजना किंवा धोरणात्मक निर्णयांची घोषणा करण्यास मनाई असेल. या निवडणुकीसाठी २८८ निवडणूक अधिकारी, २८८ सहाय्यक अधिकारी आणि ६६,७७५ निवडणूक कर्मचारी तैनात केले जातील. मतदान केंद्रांवर अपंग, गर्भवती महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष सुविधा उपलब्ध असतील. काही मतदान केंद्रे महिला गुलाबी बूथ म्हणून चालवले जातील. बहुसदस्यीय पद्धतीने मतदान नगर परिषदेची निवडणूक बहुसदस्यीय पद्धतीने (Multi-member system) घेण्यात येणार आहे. नगर परिषदेच्या एका वॉर्डात दोन (२) किंवा तीन (३) जागा असतील. अंतिम मतदार याद्या ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झाल्या होत्या आणि याच यादीनुसार मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. मतदारसंघनिहाय मतदार याद्या ७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केल्या जातील. ईव्हीएमवरच मतदान घेण्यात येणार या निवडणुका इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशिनद्वारेच (EVM²) घेतल्या जातील असे निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे. निवडणूक आयोगाने निवडणुकीतील पारदर्शकता आणि सोयीसाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. नगर पंचायतीच्या निवडणुकीसाठी उमेदवारांना २ लाख रुपये इतकी खर्च मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. मतदारांसाठी एक खास प (-pp) देखील लॉन्च करण्यात आले आहे. मतदारांच्या सोयीसाठी आणि माहितीसाठी हे मोबाईल प विकसित करण्यात आले असून त्याद्वारे मतदारांना त्यांचे नाव, मतदान केंद्र आणि उमेदवारांविषयी माहिती मिळवता येईल.

दुबार मतदारांसाठी विशेष नियम मतदान प्रक्रियेतील त्रुटी दूर करण्यासाठी दुबार मतदारांसाठी (Duplicate Voters) विशेष नियम करण्यात आला आहे. दुबार मतदारांच्या नावापुढे डबल स्टार (✻✻) चिन्हांकित केले जाईल. या दुबार मतदारांची यादी वेगळी प्रसिद्ध केली जाईल. संबंधित मतदाराकडून तो अन्यत्र मतदान करणार नाही, याची हमी घेतली जाईल. निवडणुकीच्या या घोषणेने महाराष्ट्र राज्याच्या ग्रामपातळीवरील राजकारणात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचे नियम निवडणूक प्रक्रियेतील महत्त्वाचे नियमही आयोगाने स्पष्ट केले आहेत. ३१ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार याद्यांनुसार मतदान प्रक्रिया पार पडेल आणि मतदारसंघनिहाय मतदार याद्या ७ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध केल्या जातील. नामनिर्देशन पत्र ऑनलाईन सादर करता येणार असून अर्ज करताना जात वैधता प्रमाणपत्र नसले तरी चालेल, परंतु निवडून आल्यानंतर सहा महिन्यांच्या आत ते सादर करणे बंधनकारक असेल.

## माजी मंत्री दीपक केसरकर अडचणीत! रोहित आर्या एन्काउंटर प्रकरणानंतर होणार चौकशी



मुंबईतील पवई येथे रोहित आर्याने आर.ए.स्टुडिओमध्ये आर्थिक व्यवहारांशी संबंधित मागण्यांवरून १७ मुलांसह १९ जणांना ओलीस ठेवले होते. शिक्षण विभागासाठी केलेल्या कामाच्या थकबाकीमुळे हे कृत्य केल्याचा दावा रोहित आर्याने केला होता. ज्याचा व्हिडिओ शेअर करत त्याने ही माहिती दिली होती. मात्र पोलिसांनी केलेल्या कारवाईत रोहित आर्यचा मृत्यू झाला आणि पीडित मुलांची सुखरूप सुटका करण्यात आली.

या घटनेदरम्यान रोहित आर्याला समजावणारे अधिकारी, स्टुडिओला भेट दिलेल्या कलाकारांसह तत्कालीन शिक्षणमंत्रीमंत्री दीपक केसरकर यांची चौकशी करून जबाब नोंदविण्यात येणार आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, पोलीस रोहित आर्याशी वाटाघाटी करण्याचा प्रयत्न करत होते, त्यावेळी रोहितने माजी शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांच्याशी संपर्क साधून बोलण्याची मागणी केली होती. परंतु केसरकर यांनी त्याच्याशी बोलण्यास नकार दिल्याची माहिती समोर आली आहे. याबाबतची कबुली केसरकर यांनी दिली असून असे का केले? यामागचा खुलासा देखील त्यांनी केला आहे.

मंत्री नाही, म्हणून रोहित आर्यासोबत याबाबत केसरकर म्हणाले, मी सध्या मंत्री नाही, म्हणून रोहित आर्याशी बोलून त्याला कोणंतही ठोस आश्वासन देऊ शकत नव्हतो. मुलं ओलिस असताना आर्य याला ठोस आश्वासन देणं गरजेचं होतं. म्हणूनच संबंधित मंत्री किंवा शिक्षण विभागातील संबंधित अधिकारी यांच्याशी त्याने बोलावं अशी सूचना मी पोलिसांना दिली होती, असं केसरकर यांनी म्हटलं. यावेळी त्यांनी तपासामध्ये सहकार्य करणार असल्याचेही सांगितले. त्यामुळे आता याप्रकरणात दीपक केसरकर काय जबाब नोंदवणार पाहणं महत्वाचं ठरेल.

## 'या' ठिकाणी भाजप-सेना एकत्र लढणार नाही; माजी खासदाराने दिली माहिती, कारणही सांगितलं

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपकडून दुरावलेल्या नेत्यांना जवळ केले जात असून यामुळे पुन्हा हे नेते 'स्व'गृही परतत आहेत. भाजपच्या लोटस ऑपरेशनला मोठे यश मिळताना दिसत आहे. भाजपमध्ये जोरदार इन्कमिंग वाढले आहे, अशातच नंदुरबारमधील राजकारणात गावित कुटुंबाचा दबादबा असून, याच कुटुंबातील माजी खासदार हिना गावित स्वगृही परतल्या आहेत. नुकताच त्यांचा पक्षप्रवेश झाला असून त्या भाजपात येताच त्यांनी स्थानिक निवडणुकीत



अर्थात जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीतबाबत भूमिका स्पष्ट केली आहे. माजी खासदार हिना गावित यांनी भाजप आणि शिवसेनेच्या युतीबाबत एक मोठं वक्तव्य करत भूमिका स्पष्ट केली आहे. नंदुरबार आणि अक्कलकुवा विधानसभा मतदारसंघात भाजप आणि शिवसेना यांच्यात युती होणार नाही, अशी माहिती हिना गावित यांनी दिली आहे. पुढे बोलताना त्यांनी युती का होणार नाही याचे कारणही सांगितले आहे.

## निवडणुकांच्या तारखांची घोषणा होणार? आज राज्य निवडणूक आयोगाची महत्त्वाची पत्रकार परिषद

राज्य निवडणूक आयोगाची पत्रकार परिषद आज दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रात गेल्या अनेक महिन्यांपासून प्रलंबित असणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची आज घोषणा होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आजपासून आचारसंहिता लागण्याची शक्यता वर्तवली जात आहे. प्रभाग रचना आणि इतर मागासवर्गीयांचे आरक्षण यांसारख्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या मुद्द्यांवरून या निवडणुका रखडल्या होत्या. अखेर आज पहिल्या टप्प्यातील २४६ नगरपालिका आणि ४२ नगरपंचायतींच्या निवडणुकांची घोषणा होऊ शकतात. त्यानंतर ग्रामपंचायत आणि इतर निवडणुका होण्याची शक्यता आहे. दरम्यान, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी पूर्ण करण्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट निर्देश दिले असल्याने राज्य निवडणूक आयोगावर वेळेचे बंधन आहे. त्यापार्श्वभूमीवर निवडणुकीच्या तारखांची आज घोषणा होण्याची दाट शक्यता आहे. निवडणुका तीन टप्प्यांत? निवडणूक आयोगाच्या सूत्रांनी



दिलेल्या माहितीनुसार, महापालिका, नगरपालिका, नगरपंचायती, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका तीन टप्प्यांत घेतल्या जातील. पहिल्या टप्प्यात नगरपालिका आणि नगरपंचायत, दुसऱ्या टप्प्यात जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या, तर तिसऱ्या टप्प्यात महापालिकांच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर होऊ शकतो. एकीकडे, मतदारयाद्यांमधील त्रुटी दूर झाल्याशिवाय निवडणुका घेऊनच दाखवा, असे आव्हान विरोधकांकडून देण्यात आले आहे. तर दुसरीकडे आयोगाकडून आज दुपारी ४ वाजता पत्रकार परिषदेत निवडणुकांच्या तारखा जाहीर होऊ शकतात.

## मंत्री ना. आशिष शेलार, आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत काँग्रेसचे नेते नाथसिंह देशमुख यांचा भाजपात प्रवेश

लातूर :- लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख आणि रवींद्र काळदाते यांच्यासह इतर अनेकांनी राज्याचे सांस्कृतीक कार्यमंत्री ना. आशिषजी शेलार आणि भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत सोमवारी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला आहे. या प्रवेशामुळे तोंडावर येऊ घातलेल्या निवडणुकीत काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ना. आशिषजी शेलार यांनी सोमवारी सायंकाळी एमआयटी परिसरातील प्रयाग या भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.



याप्रसंगी लातूर ग्रामीण मतदार संघाच्या वतीने मंत्री महोदयांचा यथोचित सत्कार करून आ. कराड यांनी स्वागत केले. यावेळी लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष नाथसिंह देशमुख आणि रवींद्र काळदाते यांच्यासह इतर अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला. लातूर ग्रामीण मतदार संघातील गावागावातील वाडी वस्तीतील काँग्रेस व इतर पक्षातील अनेक जण सातत्याने आ कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीत प्रवेश करत आहेत. नाथसिंह देशमुख यांच्या या भाजपा पक्ष प्रवेशामुळे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या येत्या काळात होऊ घातलेल्या निवडणुक निमित्ताने काँग्रेस पक्षाला मोठा धक्का बसला आहे.

ना. शेलार आणि आ. कराड आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक निमित्ताने तसेच लातूर ग्रामीण मतदार संघातील विविध तीर्थक्षेत्र व इतर विकास कामाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा झाली.

यावेळी संत गोपाळ बुवा महाराज साखर कारखान्याचे चेअरमन राजेश कराड, भाजपाचे अजित पाटील कव्हेकर, विक्रमकाका शिंदे, सुरज शिंदे, महेंद्र गोडभरले, उद्धव काळे, प्रताप पाटील, शरद दरेकर, अनिल भिसे, पद्माकर चिंचोलकर, गणेश मद्दे, नागेश पाटील, सौदागर पवार, उमेश काळदाते, पंडित सूर्यवंशी, अभंग चव्हाण, सिद्राम शिंदे, काशिनाथ कांबळे, दशरथ सरवदे, बन्सी भिसे, साहेबराव मुळे, श्याम वाघमारे, अमर चव्हाण, गोपाळ पाटील, विजय चव्हाण, बालाजी शिंदे, लक्ष्मण यादव, चंद्रकांत वांगस्कर, संजय डोंगरे, राम भताने, भैरवनाथ पिसाळ, बाबा भिसे, महेश गाडे, रवींद्र नागरगोजे, पांडुरंग बालवाड, मारुती शिंदे, हनुमंत गव्हाणे, माधव घुले, आदिनाथ मुळे, संजय ठाकूर, सोमनाथ वाघमारे, महादेव गुरुशेट्टे, किशोर गुट्टे, ज्ञानेश्वर जुगल, परमसिंह देशमुख, बाबुराव कस्तुरे, निवृत्ती लहाने, किरण मुंडे, अच्युत कातळे, दत्ता सरवदे, शेख अजीम, बालाजी गवळी, श्रीमंत नागरगोजे, भुजंग काळदाते, वैजनाथ लहाने, लक्ष्मण खलंग्रे, शिवरुद्र चवंडे, नरसिंग येलगटे, संतोष राठोड, दीपक बनसोडे, पद्माकर होळकर यांच्यासह लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ते एक तुच्छ व्यक्ती, फक्त चर्चेसाठी स्वामी प्रसाद मौर्यांना उमा भारतींचे सडेतोड उत्तर

मध्य प्रदेशच्या माजी मुख्यमंत्री उमा भारती यांनी अपनी जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी प्रसाद मौर्य यांच्या विधानावर जोरदार टीका केली आहे, ज्यात त्यांनी, जय श्री राम ही घोषणा आता अराजकता पसरवण्याचा परवाना बनली आहे. असे धक्कादायक विधान केले होते. त्यांच्या याच विधानाला आता उमा भरती यांनी उत्तर दिले आहे. बातम्यांमध्ये राहण्यासाठी विधाने – उमा भरती उमा भारती यांनी, मौर्य याना उत्तर देताना,तुम्ही ज्या व्यक्तीचे नाव घेत आहात तो स्वतःला प्रसिद्धीच्या झोतात आणण्यासाठी असे करतो. तो खूप तुच्छ व्यक्ती आहे. तो स्वतःला प्रसिद्धीमध्ये आणण्यासाठी बोलतो आणि असे करून तो देशाचे मोठे नुकसान करतो. असे म्हणत त्यांच्यावर सडकून टीका केली.



निघण्यापूर्वी स्वच्छतेचे कर्ज फेडा 'गंगा स्वच्छता श्रद्धा संकल्प अभियान' बद्दल उमा भारती म्हणाल्या की, देशभरातून मर्यादित संख्येने लोक संगम किनाऱ्यावर येतील. ३ नोव्हेंबर रोजी गंगेत सामूहिक स्नान होईल. मग, महाकुंभात स्नान करण्यासाठी आणि स्वतःला शुद्ध करण्यासाठी येथे आलेल्या ५० कोटी भाविकांना आम्ही आवाहन करू, ज्यांनी येथे पोहोचण्यासाठी खूप तपश्चर्या केली आहे.

दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## विश्वविजयातून विश्वभानाकडे

या महिला क्रिकेटपटू देशात महिला सबलीकरणाचे केवळ एक दालन ठरतात. इतर अनेक दालने बंदच आहेत 'इट्स जस्ट अ गेम ' या चार इंग्रजी शब्दांनी रविवारी नवी मुंबईत झालेल्या महिला विश्वचषक अंतिम सामन्याचे वर्णन करणे हे भारतीय क्रिकेटपटूंप्रति विलक्षण अन्याय्य आणि कदाचित क्रूरही ठरेल. अश्रू, घाम सांडून नि हाडे, स्नायूंवर अनन्वित ताण देऊन; काही सामन्यांमध्ये पराभव पचवून; खराब कामगिरी वा दुखापतीमुळे विस्कटलेली संघाची घडी पुन:पुन्हा बसवून; प्रत्येकीने वैयक्तिक सुखदु:ख आणि यशापयश पचवून अंतिमत: संघासाठी आणि देशासाठी विजयी उद्दिष्ट ठेवून भारतासाठी पहिलेवहिले महिला जगज्जेतेपद खेचून आणले. नैराश्याचे क्षण अनेकींच्या पदरी आले. पण ते नैराश्य जोजवत या बसल्या नाहीत. उपान्त्य सामन्याची मानकरी ठरलेल्या जेमिमा रॉड्रिग्जला या स्पर्धेतील काही सामन्यांतून वगळण्यात आले होते. त्यातून तिचा निर्धार पक्का होत गेला. अंतिम सामन्याची मानकरी ठरलेल्या शफाली वर्माचा मूळ संघातच समावेश नव्हता. सलामीवीर प्रतीका रावळला दुखापत झाल्याने स्पर्धेतून माघार घ्यावी लागली, त्यामुळे देशात कुठेतरी स्थानिक क्रिकेट खेळत असलेल्या शफालीला ऐनवेळी पाचारण करण्यात आले. तिने जराही विचलित न होता अंतिम सामन्यात नि विश्वविजेतेपदात निर्णायक भूमिका बजावली. या स्पर्धेत भारतीय संघाला मधल्या टप्प्यात सलग तीन पराभवांचा सामना करावा लागला, तेही प्रत्येक सामन्यात सुस्थितीत असताना. त्यातून आत्मविश्वासाला धक्का न लावता सखोल आत्मपरीक्षण झाले. त्याचे श्रेय कर्णधार हरमनप्रीत सिंग आणि प्रशिक्षक अमोल मुझुमदार यांना. हरमनप्रीत कौर आणि स्मृती मनधाना या संघातील दोन प्रमुख खेळाडू. उपान्त्य आणि अंतिम सामन्यात त्या भारतीय डावात शेवटपर्यंत न टिकताही समाधानकारक धावसंख्या उभारणीत खंड पडला नाही. कारण या दोघांपलीकडे गुणवत्ता आणि मानसिकता शाबूत ठेवण्याचे प्रयत्न महिला क्रिकेटमध्ये आवर्जून झाले, त्याचीच ही पावती. तीन-तीन पराभव पाहावे लागूनही हार न मानता मोक्याच्या सामन्यांमध्ये उभ्या राहिलेल्या या चमूच्या कणखर मानसिकतेचे विश्लेषण व्यवस्थापनशास्त्राच्या अभ्यासक्रमांमध्ये आवर्जून समाविष्ट करावे अशा तोडीचे. पाश्चिमात्य विद्यापीठांमध्ये अशा प्रकारचे अभ्यास होत राहतात, आपण अद्याप त्या दिशेने सरकलेलो नाही. महिला क्रिकेटने आजवर केवळ गौरबहुल विश्वविजेतेच पाहिले होते. प्रथम इंग्लंड, बहुतेकदा ऑस्ट्रेलिया नि एकदा न्यूझीलंड. भारत हा रूढार्थाने पहिला गौरेतर विश्वविजेता. भारतीय महिला अंतिम टप्प्यावर यापूर्वी दोन वेळा पोहोचल्या, पण विश्वविजेतेपदाने हुलकावणी दिली. यावेळी तसे झाले नाही. तसे होणार नव्हते. याचे कारण प्रत्येक सामन्यात आधीच्या सामन्यातील त्रुटींमधून हा संघ शिकत गेला. सुरुवातीस श्रीलंका, पाकिस्तानविरुद्धचे सामने जिंकले, त्यात सफाई नव्हती. मग सुरू झाली तीन पराभवांची कष्टप्रद मालिका. प्रथम दक्षिण आफ्रिका, मग ऑस्ट्रेलिया आणि अखेरीस इंग्लंड. याचा अर्थ सुरुवातीच्या पाच सामन्यांमध्ये कामगिरी अपेक्षित नव्हती. तरीदेखील सहाव्या सामन्यात विजय मिळवून हा संघ उपान्त्य फेरीत पोहोचला. तेथे पुन्हा तोच ऑस्ट्रेलियाचा संघ नि अंतिम फेरीत तोच दक्षिण आफ्रिकेचा संघ. यावेळी मात्र आधीच्या सामन्यांतील चुकांची पुनरावृत्ती घडली नाही. याचे कारण शारीरिक कौशल्यापेक्षाही मानसिक लढाई या मुलींनी, महिलांनी जिंकलेली होती. विश्वचषकासारख्या प्रदीर्घ स्पर्धेत प्रत्येक सामन्याचे प्रत्येक दिवशी वेगवेगळे गणित असते. प्रत्येक दिवशी नवी ऊर्जा, नवे डावपेच वापरताना, आधीच्या दिवसांची रडगाणी उगाळायची नसतात. त्यातही उल्लेखनीय ठरला भारताचा उपान्त्य फेरीतील ऑस्ट्रेलियाविरुद्धचा विजय. ऑस्ट्रेलियाने महिला क्रिकेटमध्ये जो दबदबा निर्माण केला, त्यास अखिल क्रीडाविश्वात तोड नाही. या संघाच्या नावावर जितकी विश्वविजेतेपदे आहेत, तितकी म्हणजे सात इतर तीन विश्वविजेत्यांची (इंग्लंड, न्यूझीलंड आणि आता भारत) एकत्रित करूनही भरत नाहीत. विशेष म्हणजे २०१७नंतर हा संघ पहिल्यांदाच पराभूत झाला. त्याही वेळी त्यांना हरवताना समोर भारतीय संघ होता, नि याही वेळी. पण तो भारतीय संघ आणि हा भारतीय संघ यांत फरक होता. उलट परवा नवी मुंबईत झालेल्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ मात्र ओळखू येत नव्हता. अनेक क्षुल्लक चुका, मोक्याच्या वेळी गळपटणे असे एरवी खास भारतीय म्हणून हिणवले गेलेले 'गुण' त्या संघात दिसत होते. यात प्रतिस्पर्धी संघाचा म्हणजे भारताचा वाटा होताच. दडपणाखाली ऑस्ट्रेलियाचा संघ आला होता नि त्यांस चुका करणे भाग पाडले जात होते. भारतीय संघाचा खेळ निर्दोष नव्हता, पण निर्णायक क्षणी तो उंचावेल किंवा किमान घसरणार नाही याचे भान आपल्या संघाने राखले. अंतिम सामन्यावर मुंबई, महाराष्ट्रावर आसूड ओढणाऱ्या अवकाळी पावसाचे सावट होते. तरीदेखील भारतीय संघाची लय आणि एकाग्रता भंगली नाही. त्या निकषावर दक्षिण आफ्रिकेचा संघ कमी पडला.

हरमनप्रीतच्या २०२५मधील या संघाची तुलना कपिलदेव यांच्या १९८३मधील संघाशी होणे स्वाभाविक. त्या अजिंक्यपदाने भारतीय आणि जागतिक क्रिकेटचा पोत बदलला. वेस्ट इंडिजसारख्या एके काळच्या मातबर संघाची सद्दी कायमची सरली. पण ही तुलना टाळणेच हितकारक. दोन्ही विजयांचे परिप्रेक्ष्य वेगळे नि खुमारी निराळी. १९८३मधील त्या विजयाने भारतात क्रिकेट 'बदलले'. पण ते खरेच 'सुधारले' का, आणि 'सुधारणा' म्हणजे नक्की काय अपेक्षित याचाही विचार व्हावा. सर्वसामान्य क्रिकेटप्रेमी या खेळाकडे अधिक संख्येने वळले, तसेच राजकारणीही वळले नि कॉर्पोरेट विश्वही. यातून खेळाची नि खेळाडूंची श्रीमंती वाढली, पण भारताचे प्रगतीपुस्तक दीप्तिमान झाले असे छातीठोकपणे सांगता येत नाही. उलट इतर क्रीडाप्रकारांकडे यातून दुर्लक्ष होत गेले. ऑलिम्पिकमध्ये भारतीय तारे थोडेफार लुकलुकू लागले, त्यावेळी भारतीय क्रिकेटचे नैराश्यपर्व सुरू होते हा योगायोग नाही. आज पुरुषांच्या क्रिकेटमध्ये ऐश्वर्य आहे, तशाच अपप्रवृत्तीही आहेत.

# आमचं अस्तित्व आमच्या प्रतिभेवर उभं आहे, लिंगावर नाही.

भारताच्या कन्यांनी पुन्हा एकदा जगाला दाखवून दिलं की, क्रीडा म्हणजे केवळ विजय किंवा पराभव नाही. ती असते आत्मा, मूल्यं आणि देशाचं स्वाभिमान उचलून धरण्याची जिद्द! महिला क्रिकेटच्या अंतिम सामन्यात दक्षिण आफ्रिका संघ हरला, पण हा पराभव केवळ स्कोअरबोर्डवरचा आहे. वास्तविक, हरले मनुचे विचार, ते विचार जे स्त्रियांना सीमांत ठेवू पाहतात. तरीही या पराभवात एक गूढ विजय दडलेला आहे. हा विजय आहे संविधानाचा, समतेचा आणि स्त्रीशक्तीच्या उदयाचा!

काल मैदानावर भारतीय कन्या दमदार खेळत होत्या. घाम, मेहनत आणि आत्मविश्वासाने भरलेल्या! त्यांच्या प्रत्येक चौकारात आणि झेलात एक घोषणा होती. आम्ही दुर्बळ नाही, आम्ही भारताची शक्ती आहोत. कधीकाळी स्त्रियांना घरापुरतं मर्यादित ठेवणाऱ्या 'मनुस्मृतीच्या' विचारांनी त्यांना दुर्बळ, गौण ठरवलं. पण आज, मैदानावर जेव्हा स्मृती मंधाना, हरमनप्रीत, जेमिमाह आणि दीप्ती यांसारख्या मुली चौकार-षटकारांनी मैदान दणाणवतात, तेव्हा मनुचे सगळे नियम धुळीला मिळतात. या अंतिम सामन्यात जरी भारत हरला, तरी त्या प्रत्येक धावेमागे स्त्रीच्या शतकानुशतकांच्या संघर्षाची प्रतिध्वनी होती. तो झंकार होता बदलाचा, समानतेचा आणि आत्मसन्मानाचा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेलं भारतीय संविधान हे केवळ कायद्याचं पुस्तक नाही, ते आहे सामाजिक न्यायाचं जिवंत घोषवाक्य आणि ते सामाजिक न्यायाचा प्राण आहे. महिला क्रिकेट संघाने त्या तत्त्वांना प्रत्यक्षात उतरवलं आहे. जात, धर्म, प्रांत, वर्ग, किंवा लिंग यांच्या पलिकडे जाऊन, केवळ भारतीय म्हणून खेळणं! कशाला ही न जुमानता केवळ भारत या नावाने त्यांनी जगाशी सामना केला. मैदानावर धावताना या मुली सांगत होत्या. आम्ही समानतेसाठी झगडणाऱ्या भारताच्या मुली आहोत, आमचा पराभवही स्वातंत्र्याचा सण आहे!

हो, निकाल आपल्या बाजूने नव्हता, पण मैदानावर भारतीय झेंड्याखाली उभ्या असलेल्या त्या बारा मुलींच्या नजरेत जो आत्मविश्वास होता, तो हजार विजयांपेक्षा मोठा होता आणि तीच खरी क्रांती होती. त्यांनी दाखवून दिलं की पराभवातही क्रांती असते. तो पराभव होता जुन्या रूढींचा आणि विजय होता नव्या स्त्रीशक्तीचा. त्यांनी सिद्ध केलं की भारतात आज स्त्रिया फक्त खेळत नाहीत, त्या इतिहास लिहित आहेत. त्या 'मनुच्या पराभवाचा' आणि 'संविधानाच्या विजयाचा' साक्षात पुरावा आहेत.




हा सामना हरल्यावर आपण डोकं खाली न करता, संविधानाच्या मूल्यांनी प्रेरित होऊन उंचावलेलं ठेवलं पाहिजे. कारण ही लढत केवळ क्रिकेटची नव्हती, चेंडू आणि बॅटची नव्हती. तर ती होती विचारांची, समतेची, आणि मानवी प्रतिष्ठेची. आज मनु हरला हे फक्त वाक्य नाही, तर तो एक इतिहासाचा क्षण आहे, जो सांगतो की भारत आता पूर्णपणे नव्या युगात प्रवेश करत आहे. जिथे प्रत्येक मुलगी स्वतःचं स्वप्न स्वतः लिहिते आणि प्रत्येक विजयात संविधानाचा नाद घुमतो! आता भारतीय समाजाला खरी ओळख मिळाली आहे. त्यांनी दाखवून दिलं की महिला क्रिकेट संघाचं हे पराभवातील यश आपल्याला सांगून जातं. विजय म्हणजे फक्त ट्रॉफी नव्हे; समानतेचं आणि सन्मानाचं रक्षण हाच खरा विजय आहे. भारतीय महिला क्रिकेट संघाला आपण सलाम करतो

*********

प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# पुढच्यास ठेच, मागचा

तरुणवर्गाच्या समस्या सोडविण्याकडे नेपाळच्या राज्यकर्त्यांचे दुर्लक्ष झाल्यामुळे तरुणांमधील असंतोष प्रचंड वाढला आणि त्यांनी सत्ता उलथवली. यातून भारताने शहाणे व्हावे.

सध्याच्या काळातील जागतिक परिस्थिती दक्षिण आशियातील राजकीय आणि सामाजिक घडामोडींकडे पाहिले तर खूप गुंतागुंतीची आणि धोकादायक दिसते. एकेकाळी जगाच्या नकाशावर 'सभ्यता', 'स्थिरता' आणि 'संस्कृती' यांचा वारसा जपणारा हा भाग, आता प्रचंड अस्थिरता, आर्थिक संकट, धार्मिक व जातीय संघर्ष, राजकीय भ्रष्टाचार, चारित्र्यहीन राजकीय नेते, भ्रष्ट शिक्षण पद्धती, बेरोजगारी, महागाई आणि युवकांचा प्रचंड असंतोष या सर्वांचा केंद्रबिंदू झाला आहे.

युवकांच्या आशा-आकांक्षा, अपेक्षा समजून घेतल्या नाहीत, तर त्या देशाचा पाया डगमगतो, हे नेपाळचे उदाहरण स्पष्ट करते. नेपाळमध्ये गेल्या दोन दशकांत मोठ्या राजकीय उलाढाली झाल्या. राजेशाही कोसळली, प्रजासत्ताक आले. साम्यवादी आणि प्रजातांत्रिक, लोकशाही शक्तींचे सत्तेसाठी संघर्ष सुरू राहिले. पण या संघर्षात एक गोष्ट सतत दुर्लक्षित झाली ती म्हणजे युवकांची मन:स्थिती, जिला जेन-झी म्हटले जाते. जेन-झी म्हणजे १९९७ नंतर जन्मलेले युवक-युवती. मोबाइल, इंटरनेट, समाज माध्यमे यांचा परिचय असलेली ही पिढी सार्या जगाशी जोडलेली आहे. त्यामुळे त्यांची विचारक्षमता, आकलनक्षमता, मानसिक अवस्था यांना त्यांच्या देशाच्या मर्यादा नसतात. नेपाळातील युवकांच्या अपेक्षा त्यांच्या लहानपणापासूनच स्पष्ट आहेत. त्यांना दर्जेदार व आधुनिक शिक्षण, पारदर्शक शासन, रोजगाराच्या संधी, भ्रष्टाचारमुक्त वातावरण, चारित्र्यवान नेते हे हवे आहे. परंतु, पारंपरिक नेत्यांच्या स्वार्थी राजकारणात त्यांना हे द्यायला हवे याकडे लक्षच दिले गेले नाही. तरुणांच्या अपेक्षांकडे पार दुर्लक्ष झाले आणि परिणामी असंतोष वाढत गेला. समाज माध्यमांच्या वापरावरील बंदी हे उद्रेकाचे तत्कालिक कारण होते. नेपाळी युवकांचा राग केवळ एका पक्षावर किंवा सरकारवर नाही. त्यांचा राग संपूर्ण देशातील परिस्थितीविरुद्ध, व्यवस्थेविरुद्ध आहे. भारताचे बरेच शेजारी देश संकटात सापडलेले दिसतात. पाकिस्तानमध्ये परिस्थिती स्फोटक आहे. तेथे अनागोंदीच आहे. अफगाणिस्तानात अमेरिकेच्या माघारीनंतर तालिबानची सत्ता आली. बांगलादेश आणि नेपाळमधील घटनांमधून एक संदेश मिळतो, तो असा की, युवकांना दुर्लक्षित केले, त्यांना गृहीत धरले, त्यांच्या आशा, आकांक्षा, अपेक्षा याकडे दुर्लक्ष केले तर संपूर्ण देश कधीही संकटात येतो. लोकशाहीत सरकार बदलतात हे नैसर्गिक व सत्य आहे. शेजारी देशांतील सत्ता मात्र उलथवली गेली. त्यामागे परकीय शक्ती असल्याची चर्चा आहे. मुख्य कारण म्हणजे शासन आणि जनता यांच्यातील वाढलेली प्रचंड दरी, लोकांच्या व युवकांच्या अपेक्षा वाढल्या, पण सरकारने प्रतिसाद दिला नाही. भ्रष्टाचार, घराणेशाही, बेरोजगारी, जातीयवाद, चारित्र्यहीनता आणि अकार्यक्षमता यामुळे जनतेचा विश्वास नष्ट होतो. त्यासाठी जनता थेट सत्तेला आव्हान देते. त्यासाठी युवक पुढाकार घेतात. हेच नेपाळमध्ये, श्रीलंका, बांगलादेश येथे घडले. भारत आणि नेपाळ यांचे नाते केवळ शेजार्यांचे नाही ते सांस्कृतिक आणि धार्मिक परंपरांनी जोडलेले आहे. भारतीयांचा मोठा व्यापार आणि वावर नेपाळमध्ये आहे. म्हणूनच नेपाळातील अस्थिरता भारतासाठी धोकादायक आहे. नेपाळी युवकांवर अनेक शक्तीचा प्रभाव आहे. साम्यवादाचा प्रभाव आहे. कारण तेथील माओवादी चळवळींनी दीर्घकाळ युवकांना आकर्षित केले.



आर्थिक गुंतवणूक, पायाभूत प्रकल्प, प्रचंड कर्ज, हिंसाचाराला प्रोत्साहन देणारे तत्त्वज्ञान या माध्यमांतून चीनचा नेपाळमधील प्रभाव वाढेल. समाज माध्यमांमुळे अमेरिकन, युरोपीय, आशियाई विचार थेट नेपाळी युवकांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे असंख्य भारतीयांच्या नजरेत ते नुसते गुरखे नाहीत. आधुनिकता, साम्यवाद, राष्ट्रवाद, जागतिकीकरण, खासगीकरण यांच्या गुंतागुंतीशी तेथील युवक संघर्ष करीत आहेत. आता जगातील कोणताही युवकवर्ग घ्या, तो जगाशी जोडलेला असणे स्वाभाविकच अमेरिकेत समलैंगिक विवाह कायदेशीर ठरतो, त्यातही भारतातील युवक त्याबद्दल चर्चा करतात. ते ट्रम्प यांच्या विदुषकी कृत्यांची चर्चा करतात. युरोपात पर्यावरण प्रश्न महत्त्वाचे ठरतात, तर त्यावर भारतीय विद्यार्थी आवाज उठवतात. तेच नेपाळमध्येही घडत आहे. त्यातून त्यांच्या आशा-आकांक्षा, अपेक्षा विकसित झाल्या, त्यांची राज्यकर्त्यांनी दखल घेणे जरुरीचे होते. त्यांना ते जमले नाही म्हणून नेपाळमध्ये या घटना घडल्या. या तुलनेत भारताची सर्वात मोठी ताकद म्हणजे येथील लोकशाही, न्यायव्यवस्था, संसद आणि घटना. समाज माध्यमे ही ताकद अशी आहे की तो भौगोलिक सीमारेषा पुसून टाकते. त्यामुळे यापुढे युवकांना थांबवणे अवघड होईल. अशा स्थितीत त्यांना व त्यांच्या विचारांना योग्य दिशा देणे त्यांच्या यापुढे आशा, अपेक्षा, आकांक्षा यांचा विचार करणे हाच उपाय ठरतो.

आपण म्हणतो की, भारताचा युवकवर्ग हीच आपली सर्वात मोठी ताकद आहे. युवकांच्या बळावरच भारत महासत्ता होण्याचे स्वप्न पाहतो, त्या स्वप्नाचा पाया म्हणजे युवकांची ऊर्जा, कौशल्य, शक्ती आणि त्यांचा देशाच्या विकासातील सहभाग. त्यांची ऊर्जा विध्वंसाकडे, हिंसाचाराकडे जायला नको, याची काळजी घेण्याची जबाबदारी राज्यकर्त्यांची आणि समाजधुरिणांची आहे. युवकांचा उत्साह आंदोलनांपुरता, सभा संमेलनांपुरता मर्यादित न ठेवता त्यांना समाजकार्यात, शिक्षणात, आरोग्य सेवेत, सेवा प्रकल्पांमध्ये, संशोधनात, उद्योजकांत, संस्कृतीकडे वळवले पाहिजे. युवकांमध्ये आधुनिकतेसोबतच आपल्या परंपरा, इतिहास, मूल्ये, संस्कृती, चारित्र्य, राष्ट्रभक्ती इत्यादी यांची जाणीव विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे. यातून सशक्त, समर्थ देश निर्माण होतो. आणखी एक गोष्ट करणे आवश्यक आहे ती म्हणजे युवकांमध्ये वाचन संस्कृती, विश्लेषण करण्याची शक्ती वाढवण्याची गरज आहे. समाज माध्यमांमध्ये युवकवर्ग सतत गुंतलेला असतो. त्यांना पुस्तकांच्या वाचनाकडे जाणीवपूर्वक वळविले पाहिजे, जेणेकरून त्यांना वैचारिक खाद्य देता येईल. त्यांच्यावर सभ्यता, संस्कृती यांचे संस्कार होतील. भारताच्या सध्याच्या व्यवस्थेत संसदीय, लोकशाही, शिक्षण, न्यायव्यवस्था, उद्योगधंद्यांची वाढ, शिक्षण, देशांची घटना, लोकसंख्या, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी महत्त्वाच्या गोष्टी आहेत.

# अनावश्यक खरेदीची भुरळ!

२२ सप्टेंबरनंतर वस्तू अत्यंत स्वस्त होतील. भरपूर खरेदी करू, जीवनातील इच्छा पूर्ण करू, अशी मानसिकता सोडा. विवेकपूर्ण व क्रयशक्तीनुसार पैसा खर्च करा. जागतिकीकरणानंतर वित्तीय जगाची निर्मिती व त्याचबरोबर शोध, तंत्रज्ञान, संगणकीकरण, डिजिटलायझेशन, इंटरनेट सुविधा यामुळे जग खुलतंय, सुधारतंय, सजतंय. सर्वांना सुखी, समाधानी, ऐषोआरामी जगावसं वाटत आहे. यातूनच मानवाची स्पर्धा सुरू होत आहे. यासाठी सुरू होते पैसे कमावण्याची धडपड तसेच कमवलेला पैसा खर्च करून आपली स्वतःची वैयक्तिक पत निर्माण करण्याची इच्छा! सध्याच्या परिस्थितीत अतिउच्च सेवा-सुविधा व वस्तू प्राप्त होण्यासाठी उत्पादनांची मोठी जवळीक वाढल्याचे दिसून येते. यातूनच सेवा उद्योगाची गरज निर्माण होत आहे. पुरवठा, उत्पादन आणि सेवा क्षेत्राची व्याप्ती देशभर वाढते. सेवा क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनामध्ये ५६%, उद्योग २७% आणि शेती १७% पर्यंत हिस्सा आहे. याचाच अर्थ असा आहे की सेवा क्षेत्राचा गवगवा अर्थात प्रगतीमध्ये योगदान उच्च स्थानी आहे.




भारतात आजच्या वातावरणात सगळीकडे एकच चर्चा होत आहे की, सरकार वस्तू व सेवा (जीएसटी) कराचे दर कमी करणार. याची घोषणाही झाली आहे. यातूनच नागरिकांना मोठा दिलासा मिळेल यात शंका नाही. सरकारचे भाकित असे आहे की, कमी केलेल्या दरामुळे लोकांची खरेदी क्षमता वाढेल. तरल अर्थव्यवस्थेकडे लोक वळतील. खर्च करण्याचा वेग वाढेल, यातून उत्पादन प्रक्रिया वेगवान होऊन नोकर्या वाढतील. त्याचबरोबर बेरोजगारीचाही थोडाफार प्रश्न सुटेल. जनतेला काम मिळेल. एकंदरीत स्वदेशी अर्थव्यवस्थेकडे भारताची वाटचाल दिसून येईल.

'गूळ तेथे मुंग्या' याप्रमाणे या परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी उद्योजक/ व्यापारी सरसावले आहेत. त्यांनी आपल्या व्यवसायाची व्याप्ती वाढवण्यास सुरुवात केली आहे. जर ग्राहकांची मोठ्या प्रमाणात मागणी वाढली तर आपण स्वतःहून त्यांना पुरवठा करण्यास सक्षम राहू अशा तयारीला मोठ मोठे उद्योग लागलेले आहेत. आतापासूनच जाहिरातबाजीला सुरुवात झाल्याचे दिसून येते. जाहिरातीचे व माहितीचे मोठमोठे फलक तसेच सार्वजनिक माध्यमावर जाहिरातींचे संदेश हे ग्राहकांना भुलवण्याचे व आकर्षित करण्याचे तंत्र सर्वत्र प्रसिद्धीसाठी दिसून येत आहे.

मॉलमध्ये गेल्यानंतर एक प्रश्न पडतो. येथे भाजीपाला विक्रीला का ठेवतात? यांना कसे परवडते? पण नंतर लक्षात येते की भाजीपाला खरेदी करणारे सुरुवातीला कोथंबीर, बटाटे व इतर वस्तूंची खरेदी ५०-१०० रुपयांपर्यंत करण्याचा विचार करतात. पण नंतर तेथील झगमगाट, मालाची रेलचेल, दरपत्रक आणि सेल्समनची पटवण्याची पद्धत यामुळे मनुष्य सहजरित्या कमीत कमी हजार ते पाचशे रुपयांपर्यंत खरेदी करतो. हा मार्केटिंगचा फंडा आहे. भाजीपाला व काही स्वस्त वस्तू हा फक्त सापळा असतो; या सापळ्यामुळे ग्राहक हळुवारपणे दुसर्या खरेदीच्या जाळ्यात सापडतो. बर्याचदा वाटते की मोठ मोठाले आउटलेट, मॉल यामध्ये गिर्हाईक नसतात. पण ही आंतरराष्ट्रीय जाहिरातींची कला आहे. त्यांना त्यातून गिर्हाईक जरी नसले, परवडत नसले तरी त्यांच्या जाहिरातीसाठी अशी दुकाने उघडी ठेवणे क्रमप्राप्त असतं. इतर जाहिराती खर्चापेक्षा त्यांना ते निश्चित परवडतं.

एकावर एक मोफत, भरपूर स्वस्त, येथून पुढे अशी संधी कधी येणार नाही, कर्ज सुविधा उपलब्ध, मासिक हप्त्यावर वस्तू किंवा वस्तू घेऊन जा पैसे नंतर द्या. अशी जाहिरातीबाजी करून ग्राहकांना भुरळ पाडण्याचा प्रयत्न होतो. अर्थातच मानसिकतेनुसार मनुष्य निश्चितच क्षणिक अशा जाहिरातींचा बळी पडतो. मग आपला मोर्चा बाजारात मोठ मोठे शॉप, शॉपिंग मॉलकडे वळला जातो. 'शॉपहोलिक' नागरिकांची संख्या जास्त वाढत जाते. एक प्रकारे ग्राहक आज अनेक कंपन्याद्वारे संमोहित झालेला आहे. मॉलमधील सगळं झगमगाट पाहून त्याला त्या वस्तू अर्थात माल घेण्याची इच्छा होतेच. आपले उत्पन्न त्याचबरोबर आर्थिक कुवत, जगण्यासाठी पुढे येणारे आर्थिक खड्डे याचा विचार न करता मनुष्य अनावश्यक खरेदी करून बसतो. त्याद्वारे तो स्वतःचा पैसा गमावून बसतो. काहींच्या डोक्यावर कर्जही होते. ऐपतीपेक्षा जास्त पैशाचा वापर हा घातकच असतो.

इंग्रजीमध्ये एक प्रसिद्ध म्हण आहे ऋजजङ -अछऊ कखड चजछएध -अठए डजजछ झअ-ठढएऊ म्हणजे जो मनुष्य आर्थिकसाक्षर नाही (हुशार) त्याला पैशाचे व्यवस्थापन करता येत नाही. तो लवकरच आपले पैसे गमावून बसतो. कारण तो चुकीच्या ठिकाणी खर्च करतो किंवा इतरांना देऊन टाकतो. विचारपूर्वक पैसा खर्च करणे हे आपले कर्तव्य आहे. प्रत्येकाने अगोदर ठरवले पाहिजे की आपल्याला काय हवे आणि काय नाही. जीवनातील गरजांची यादी ही अनंत आहे. न संपणारी आहे. पण समाधानाने केलेली गरजेच्या वस्तूंची यादी ही समाधान दिल्याशिवाय राहत नाही. गरज आणि लालसा यांचा जवळचा संबंध आहे. गरज ही समाधानाने संपते, तर लालसा अमर्यादा असते. लालसेतून कधीही माणसाला शांती, सुख लाभत नाही. नवीन शोध, तंत्रज्ञान व नवनिर्मिती यामुळे बर्याच वस्तूंचे भाव दिवसेंदिवस कमीच होतात. मग आपल्याला मिळणार्या वस्तू खरंच आज कमी दराने मिळतात का? अर्थात वस्तू व सेवा कर कमी केल्याने आपल्याला खरेदी करावयाच्या वस्तू जीवनात आवश्यक व फायदेशीर आहेत का? याचाही विचार करा. अनेक उत्पादक मालाचे भाव अगोदर वाढवण्याच्या तयारीत आहेत. सध्याच्या प्रचलित दरापर्यंत भाव ठेवण्याचा प्रयत्न करत आहेत. अर्थातच कमोडिटी वस्तूंचे भाव थोड्याफार प्रमाणात वाढतात; पण इलेक्ट्रॉनिक्स, खाद्यपदार्थ, काही जीवनावश्यक वस्तू यांचे दर दिवसेंदिवस कमीही होतात. आज वस्तू आपण भरमसाठ प्रमाणात खरेदी केली म्हणजे आपले भरपूर पैसे वाचले असे नाही. नंतर त्याचे दरही कमी होऊ शकतात याचेही भान आपणास असावे. या मोहजाळापासून योग्य प्रकारे दूर राहून समांतरपणे आपण कमावलेल्या धनाचे जतन करणे गरजेचे आहे. स्वतःचा पैसा खेळता ठेवा. गुंतवणूक+ खरेदी+उत्पादन खर्च याचे योग्य सूत्र जुळवा. आवश्यक गरजा पूर्ण होईल एवढेच घ्या. आपल्याला पुरवठा करणारे त्याचबरोबर सुविधा देणारे हे निरंतर चालूच राहतील. जग हे बदलत राहणार, चालूच राहणार; पण आपली आर्थिक दृष्टी सजग ठेवा.

# मुलांच्या लसीकरणाचे वेळापत्रक चुकल्यास असे करा कॅचअप लसीकरण, जाणून घ्या सविस्तर माहिती



पालकांनो तुम्हाला तुमच्या मुलांच्या लसीकरणाचे वेळापत्रक पाळणे अवघड जातेय का? तुम्हाला माहिती आहे का, एखादे लसीकरण चुकल्यास मुलं गंभीर संसर्गजन्य आजारांना बळी पडू शकतात आणि त्यांच्या एकुण आरोग्यावर त्याचा दुष्परिणाम देखील होऊ शकतो. मात्र आता काळजी करू करण्याचे कारण नाही आपण कॅच-अप लसीकरण म्हणजेच चुकलेले एखादे लसीकरण पूर्ण करून मुलांना आवश्यक ते संरक्षण पुरविणे. यामुळे केवळ मुलांचे आरोग्य सुरक्षित राहत नाही तर रोगराई पसरण्यासही आळा बसतो.याबद्दल डॉ. अमर भिसे, सल्लागार - पीआयसीयू (बाल अतिदक्षता विभाग), नवजात शिशु व बालरोगतज्ज्ञ, मदरहूड हॉस्पिटल्स, लुल्लानगर, पुणे यांनी सविस्तर माहिती दिली आहे.

तज्ज्ञांच्या मते, मुलांचे आरोग्य आणि दर्जेदार जीवनमान राखण्यासाठी कॅच-अप लसीकरण महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्यामुळे पालकांनी आपल्या डॉक्टरांशी बोलून यासंदर्भातील सर्व शंका दूर कराव्यात आणि विलंब न करता मुलांचे लसीकरण करून घ्यावे.लसीकरण हे मुलांना गंभीर आजारांपासून वाचविण्याचे सर्वात प्रभावी शस्त्र ठरत आहे. आजारपण, प्रवास किंवा जागरूकतेचा अभाव अशा विविध कारणांमुळे बऱ्याच मुलांचे लसीकरण चुकते. अशा वेळी कॅच-अप लसीकरणाने ही उणीव भरून काढता येते. नवजात बाळ , शाळकरी मुलं आणि किशोरवयीन मुलांसाठी हे लसीकरण अतिशय आवश्यक मानले जाते. पालकांनी वेळीच लसीकरण करून मुलांच्या आरोग्याचे संरक्षण करणे ही काळाची गरज आहे.

वयगटानुसार आवश्यक लसीकरण

कॅच-अप लसीकरणातील लस:

डीटीएपी (डिप्थेरिया, टिटॅनस, पर्टसिस)

हिब (हॅमॉफिलस इन्फ्लूएंझा टाईप बी)

पोलिओ

हिपॅटायटीस बी

रोटाव्हायरस

पी सी व्ही १ ३ (न्यूमोकोकल कॉन्जुगेट लस)

लसीकरणाचे फायदे-

हा वयोगट अधिक संवेदनशील असतो. या काळात एखादी लस चुकल्यास बाळाच्या जीवाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे वेळीच लसीकरण करणे किंवा लसीकरण चुकल्यास आणखी विलंब न करता लसीकरणे पूर्ण करणे गरजेचे आहे.

या वयोगटातील लसीकरण शालेय प्रवेशासाठी तसेच मुलांच्या दीर्घकालीन आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक आहेत. या लसींमुळे शाळा व तसेच सामाजिक ठिकाणी संसर्गजन्य आजारांचा प्रसार रोखता येतो.कॅच-अप लसीकरण हे बालआरोग्य व्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे पाऊल आहे.

# संध्याकाळच्या नाश्त्यात लहान मुलांसाठी झटपट बनवा Mix Vegetable Wrap, पदार्थ पाहून मुलं होतील खुश

लहान मुलं संध्याकाळच्या वेळी शाळेतून थकून आल्यानंतर मुलांना भूक लागते. भूक लागल्यानंतर कायमच मुलांना बाहेर विकत मिळणारे पदार्थ खाण्यास हवे असतात. मुलांना मंचुरियन, शेवपुरी, पाणीपुरी, वडापाव इत्यादी पदार्थ खायला खूप जास्त आवडतात. पण कायमच बाहेरचे तिखट किंवा तेलकट पदार्थ आरोग्यासाठी चांगले नाहीत. सतत बाहेरील पदार्थांचे सेवन केल्यामुळे पोटाचे आरोग्य बिघडण्याची जास्त शक्यता असते.





त्यामुळे मुलांना कमी तिखट आणि तेलकट पदार्थ खाण्यास द्यावेत. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये मिक्स व्हेजिटेबल रॅप बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. लहान मुलं बऱ्याचदा भाज्या खाण्यास नकार देतात. अशामुळे मुलांना योग्य पोषण मिळते. शरीरात पोषणाचा अभाव निर्माण झाल्यानंतर रोगप्रतिकारशक्ती कमकुवत होऊन जाते. त्यामुळे घरातील पौष्टिक पदार्थ खाण्यास द्यावेत. चला तर जाणून घेऊया मिक्स व्हेजिटेबल रॅप बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

काकडी

गाजर

सॉस मीठ

काळीमिरी पावडर

शिमला मिरची

कांदा

आइसबर्ग लेट्यूस

दही

चाट मसाला

चिली सॉस

चीज

लसूण

कृती: मिक्स व्हेजिटेबल रॅप बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढईमध्ये तेल गरम करून त्यात लसूण, कांदा, शिमला मिरची, गाजर टाकून हलकेसे परतून घ्या.

मोठ्या वाटीमध्ये दही घेऊन त्यात काकडी, चाट मसाला, काळी मिरी आणि मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा. त्यानंतर त्यात वाफवून घेतलेल्या भाज्या मिक्स करा. तयार केलेल्या मिश्रणात टोमॅटो सॉस आणि चिली सॉस घालून व्यवस्थित मिक्स करा. तव्यावर तयार केलेली मैद्याची रोटी भाजून घ्या. त्यानंतर त्यावर सॉस आणि चिली सॉस लावून चमच्याने पसरवून घ्या. त्यानंतर वरून तयार केलेले सारण ठेवून चीज किसून घाला. तयार केलेला रॅप फोल्ड करून खाण्यासाठी सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला मिक्स व्हेजिटेबल रॅप. हा पदार्थ लहान मुलांसह मोठ्यांनाही आवडेल.

# लहान मुलांनाच काय तर तुमच्याही मनाला खुश करून जाईल हा टेस्टी 'चॉकलेट सँडविच'; नोट करा १० मिनिटांची रेसिपी



आजच्या धावपळीच्या जगात पटकन आणि चविष्ट काहीतरी खाण्याची इच्छा झाली की लगेच लक्षात येतो तो सँडविच. पण साधं सँडविच नाही, तर गोड, मुलांना खास आवडणारं, चॉकलेट सँडविच. लहान मुलं असो की मोठे, चॉकलेटचं नाव घेतलं की प्रत्येकाच्या चेहऱ्यावर हसू उमटतं. नाश्त्यासाठी, डबे पॅक करताना किंवा संध्याकाळच्या हलक्या खाण्यासाठी हा सँडविच उत्तम पर्याय आहे.

चॉकलेट सँडविच बनवायला खूप सोपं असतं आणि त्यासाठी खूप साहित्यही लागत नाही. घरच्या घरी उपलब्ध ब्रेड, बटर आणि चॉकलेट स्प्रेड वापरून तुम्ही काही मिनिटांत हॉटेलसारखा टेस्टी सँडविच बनवू शकता. त्यात थोडं क्रंचीपणा आणण्यासाठी ड्रायफ्रूट्स, बनाना स्लाइस किंवा किसलेलं चॉकलेट वापरलं तर त्याची चव आणखीनच वाढते. हा सँडविच मुलांना शाळेत डब्यात द्यायला पण एकदम बेस्ट आहे. पटकन होतो, पौष्टिक आहे आणि गोड खाण्याची इच्छा पूर्ण करतो. चला तर मग जाणून घेऊया घरच्या घरी बनणारी ही चॉकलेट सँडविच रेसिपी.

साहित्य

ब्रेड स्लाइस - ४

बटर - २ चमचे

चॉकलेट स्प्रेड / नुटेला - ३-४ चमचे

किसलेलं डार्क/मिल्क चॉकलेट - २ चमचे

कापलेले ड्रायफ्रूट्स (बदाम, काजू, अक्रोड) - २ चमचे

(ऐच्छिक) केळाचे पातळ स्लाइस - ४-५

कृती

यासाठी सर्वप्रथम ब्रेडच्या स्लाइसच्या एका बाजूला बटर लावून घ्या.

आता एका स्लाइसवर चांगला थर देऊन चॉकलेट स्प्रेड पसरवा.

त्यावर थोडं किसलेलं चॉकलेट आणि बारीक चिरलेले ड्रायफ्रूट्स शिंपडा.


हवे असल्यास काही केळाचे स्लाइस ठेवले तरी चालतील, त्यामुळे चव अजून मस्त लागते.

दुसरी ब्रेड स्लाइस त्यावर ठेवून हलकेच दाबा.

आता सँडविच टोस्टर/गॅसवरील तव्यावर दोन्ही बाजूनी सोनेरी तपकिरी होईपर्यंत भाजून घ्या. तयार चॉकलेट सँडविच गरमागरम कापा आणि सर्व्ह करा. हा सँडविच तुम्ही गरम टोस्टेड किंवा थंड (चिल्ड) डिझर्टसारखा सुद्धा खाऊ शकता. लहानांपासून मोठ्यांपर्यंत प्रत्येकासाठी ही डिश परफेक्ट आहे.

# सतत स्क्रिन पाहून डोळ्यांवर वाढलेला तणाव कमी करण्यासाठी 'हा' घरगुती उपाय ठरेल प्रभावी, डोळे राहतील तेजस्वी

धावपळीची जीवनशैली, कामाचा तणाव, सतत लॅपटॉप मोबाईलचा वापर, अपुरी झोप, मानसिक तणाव इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यासोबतच शरीरातील छोट्या अतिशय नाजूक अवयवांवर सुद्धा लगेच दिसून येतो. शरीरातील अतिशय नाजूक अवयव म्हणजे डोळे. सतत काम, मोबाईल आणि तासनतास लॅपटॉप पाहिल्यामुळे डोळ्यांवर तणाव येतो. डिजिटल युगात मोबाईल आणि लॅपटॉपचा खूप जास्त वापर केला जात आहे. जास्त वेळ स्क्रिन पाहिल्यामुळे डोळे अतिशय कोरडे पडतात. याशिवाय डोळ्यांमधून पाणी येणे, डोळे कोरडे पडणे, डोळे लाल होणे, डोळे झोंबणे इत्यादी अनेक लक्षणे दिसून येतात. डोळ्यांच्या समस्या वाढू लागल्यानंतर सतत दुर्लक्ष केले जाते. डोळ्यांच्या समस्या वाढू लागल्यानंतर काहीवेळा डोकेदुखीची समस्या उद्भवते. स्क्रीनमधून येणाऱ्या ब्लू रेजमुळे डोळ्यांच्या नसांवर अतिरिक्त तणाव येतो, ज्यामुळे डोळ्यांखाली वर्तुळ येणे, डोळ्यांखाली त्वचा काळी पडणे, डोळे अतिशय बारीक होणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. याशिवाय डोळ्यांच्या दृष्टीवर परिणाम होण्याची जास्त शक्यता असते. त्यामुळे डोळ्यांची जास्त काळजी घ्यावी. आज आम्ही तुम्हाला डोळ्यांवर वाढलेला तणाव कमी करण्यासाठी आठवड्यातून दोनदा कोणते घरगुती उपाय करावेत, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. याशिवाय डोळ्यांना विश्रांती देणे सुद्धा आवश्यक आहे.



डोळ्यांभोवती वाढलेला काळेपण कमी करण्यासाठी काही महिला महागडे स्किन केअर, क्रीम इत्यादी अनेक गोष्टींचा वापर केला जातो. पण केमिकल ट्रीटमेंट करण्याऐवजी घरगुती उपाय करून डोळ्यांची काळजी घ्यावी. घरगुती उपाय केल्यामुळे डोळ्यांची नैसर्गिक चमक कायम टिकून राहते. यासाठी अतिशय सोपा उपाय म्हणजे आठवड्यातून दोनदा किंवा तीनदा डोळ्यांवर काकडी किंवा काकडीचा रस लावणे. काकडीमध्ये असलेल्या पाण्यामुळे डोळ्यांमधील उष्णता कमी होते आणि डोळे कायमच सुंदर दिसतात. रात्री झोपण्याआधी काकडीचे पातळ तुकडे करून डोळ्यांवर ठेवावे. यामध्ये असलेल्या पाण्यामुळे डोळ्यांवर वाढलेला तणाव कमी होतो. काकडी डोळ्यांवर ठेवल्यामुळे डोळ्यांभोवती आलेली सूज, काळे डाग आणि त्वचा अतिशय मुलायम होण्यास मदत होते.

डोळ्यांसाठी अतिशय प्रभावी मानला जाणारा पदार्थ म्हणजे गुलाब पाणी. गुलाब पाणी त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी केला जातो. गुलाब पाणी डोळ्यांवर लावल्यामुळे डोळ्यांच्या स्नायूंना आराम मिळतो. याशिवाय डोळ्यांभोवती असलेली त्वचा हायड्रेट राहते आणि काळे डाग कमी होण्यास मदत होते. यासाठी वाटीमध्ये गुलाब पाणी घेऊन त्यात कापूस बुडवून डोळ्यांवर ठेवावा. रात्री झोपण्याआधी हा उपाय केल्यास डोळ्यांवर आलेला अतिरिक्त तणाव कमी होऊन जाईल.

# थंडगार वातावरणात सकाळच्या नाश्त्यासाठी बनवा हेल्दी नाचणीचे सूप, शरीरात कायमच टिकून राहील ऊर्जा

संपूर्ण देशभरात पाऊस पडत आहे.सतत पडणाऱ्या पावसामुळे आणि वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. सतत बदलणाऱ्या वातावरणामुळे साथीचे आजार मोठ्या प्रमाणावर पसरतात. साथीच्या आजारांची शरीराला लागण झाल्यानंतर शरीरात कायमच थकवा आणि अशक्तपणा जाणवू लागतो. त्यामुळे आरोग्याची जास्त काळजी घेणे गरजेचे आहे.थंडीच्या दिवसांमध्ये प्रत्येकालाच काहींना काही गरमागरम पदार्थ खाण्याची इच्छा होते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये नाचणीचे सूप बनवण्याची रेसिपी सांगणार आहोत. नाचणी बाजारात सहज उपलब्ध होते. नाचणीमध्ये असलेल्या घटकांमुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि आरोग्य कायमच निरोगी राहते. रोजच्या आहारात फायबर युक्त पदार्थांचे सेवन नियमित करावे. नाचणीचे सूप विशेष करून महिलांच्या आरोग्यासाठी अतिशय गुणकारी ठरते. त्यामुळे भूक लागल्यानंतर कोणताही तिखट तेलकट पदार्थ खाण्याऐवजी नाचणीचे सूप बनवून प्यावे. जाणून घ्या रेसिपी.





साहित्य:

नाचणीचे पीठ

आलं

लसूण

मीठ

कढीपत्ता

जिरं

तेल

कांदा टोमॅटो

गाजर

काळीमिरी पावडर

कोथिंबीर

कृती: नाचणीचे सूप बनवण्यासाठी सर्वप्रथम, वाटीमध्ये नाचणीचे पीठ घेऊन त्यात थोडस पाणी घालून पातळ पेस्ट तयार करा.

टोपात तेल गरम करून त्यात जिरं घालून भाजा. त्यानंतर त्यात आलं लसूण पेस्ट, बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो आणि गाजर घालून व्यवस्थित मिक्स करा.

सर्व भाज्या शिजल्यानंतर त्यात चवीनुसार मीठ आणि काळीमिरी पावडर घालून मिक्स करा. सर्व मिश्रण व्यवस्थित मिक्स करून झाल्यानंतर त्यात तयार केलेली नाचणीची पेस्ट टाकून व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून मिक्स करा. सूपला व्यवस्थित उकळी आल्यानंतर त्यात बारीक चिरलेली कोथिंबीर घालून मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले नाचणीचे सूप. नाचणीचे सूप आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे.

# इटालियन पदार्थाला देसी टच, घरच्या घरी सोप्या पद्धतीने बनवा मसालेदार 'मॅक्रोनी पास्ता'



आजकाल पास्ता, मॅक्रोनी यांसारख्या पाश्चात्य डिशेस मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या आवडीच्या झाल्या आहेत. पण जर या डिशेसमध्ये आपल्याला देशी ट्विस्ट मिळाला तर त्याची चव अजूनच खास होते. भारतीय मसाले, कांदा, टोमॅटो, आलं-लसूण यांचा वापर करून बनवलेली देशी मॅक्रोनी पास्ता ही एक झटपट, चवदार आणि पोटभरीची रेसिपी आहे. शाळेत जाणाऱ्या मुलांच्या टिफिनसाठी, संध्याकाळच्या नाश्त्यासाठी किंवा हलक्या रात्रीच्या जेवणासाठी ही डिश अगदी परफेक्ट ठरते.

ही रेसिपी बनवताना कोणत्याही खास सॉसची गरज नसते. आपल्या घरच्या मसाल्यांनीच उत्तम चव येते. शिवाय यात भाज्यांचा वापर केला तर पोषणमूल्य वाढते आणि ही डिश हेल्दीही बनते. लहान मुलांना खुश करण्यासाठी किंवा अचानक घरी आलेल्या पाहुण्यांना काही चवदार सर्व्ह करण्यासाठी हा एक उत्तम पर्याय आहे. चला तर मग लगेच नोट करून घेऊयात हा देसी पास्ता बनवण्यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.

साहित्य

१ कप मॅक्रोनी

१ मध्यम आकाराचा कांदा (बारीक चिरलेला)

२ टोमॅटो (बारीक चिरलेले)

१ हिरवी मिरची (बारीक चिरलेली)

१ चमचा आलं-लसूण पेस्ट

१/४ कप गाजर, ढोबळी मिरची, मटार (इच्छेनुसार)

१/२ चमचा हळद

१ चमचा लाल तिखट

१ चमचा गरम मसाला

मीठ चवीनुसार

२ टेबलस्पून तेल/लोणी

थोडी कोथिंबीर सजावटीसाठी

कृती

सर्वप्रथम पाणी उकळून त्यात मीठ व थोडं तेल घालून मॅक्रोनी शिजवून घ्या. मॅक्रोनी मऊ पण चिकट होऊ नये.

शिजलेली मॅक्रोनी गाळून बाजूला ठेवा.

कढईत तेल गरम करून त्यात कांदा परतून घ्या जोपर्यंत तो सोनेरी रंगाचा होईपर्यंत.

आता त्यात आलं-लसूण पेस्ट, हिरवी मिरची घालून छान परता.

टोमॅटो घालून शिजू द्या, जेणेकरून मऊसर पेस्ट तयार होईल.

आता हळद, लाल तिखट, गरम मसाला व मीठ टाका. मसाला नीट भाजून घ्या.

इच्छेनुसार गाजर, मटार, ढोबळी मिरची यांसारख्या भाज्या घालून २-३ मिनिटे परता.

आता त्यात शिजवलेली मॅक्रोनी घालून नीट मिसळा.

वरून कोथिंबीर टाकून गरमागरम सर्व्ह करा.

हवे असल्यास वरून चीज किसून टाकल्यास चव अजून वाढते.

मुलांसाठी कमी तिखट करून केचपसोबत देऊ शकता.

भाज्या आवडीनुसार वाढवता किंवा कमी करता येतात.

# नवरात्रीच्या उपवासानिमित्त १० मिनिटांमध्ये झटपट बनवा रताळ्याचा हलवा, नोट करून घ्या पारंपरिक पदार्थ

शारदीय नवरात्री उत्सवाला सुरुवात झाली आहे. देवीची घटस्थापना करून घरात पूजा केली जाते. तसेच नऊ दिवस देवीला नऊ वेगवेगळ्या गोड पदार्थांचा नैवेद्य दाखवला जातो. नैवेद्यामध्ये कधी शिरा, खीर, मालपुआ इतर कधी बासुंदी बनवून दाखवली जाते. पण आज आम्ही तुम्हाला रताळ्याचा हलवा बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ अभिनेत्री ऐश्वर्या नारकर यांनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंवर शेअर केला आहे. ऐश्वर्या नारकर सतत काहींना काही रेसिपी आणि फॅशन टिप्स चाहत्यांसोबत शेअर करत असतात. उपवासाच्या दिवशी साबुदाणा खिचडी, वडा, साबुदाण्याची उसळ, रताळ्याच्या किस इत्यादी काही ठराविक पदार्थ खाल्ले जातात. पण नेहमीच तेच पदार्थ खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची इच्छा सगळ्यांचं होते. रताळी आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक असतात. नियमित सकाळच्या नाश्त्यात रताळी खाल्ल्यास पोट भरलेले राहील आणि लवकर भूक लागणार नाही. रताळ्यामध्ये फायबर, विटामिन आणि पोषक घटक मोठ्या प्रमाणावर आढळून येतात, ज्यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि आरोग्य सुधारते. जाणून घ्या रताळ्याचा हलवा बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:

रताळ

साखर

वेलची पावडर

जायफळ पावडर

सुका मेवा तूप दूध साबुदाणा खिचडी खाऊन कंटाळा आला असेल तर सोप्या पद्धतीमध्य नाश्त्यासाठी बनवा साबुदाण्याचे कस्टर्ड कृती: रताळ्याचा हलवा बनवण्यासाठी सर्वप्रथम, रताळी स्वच्छ धुवून घ्या. धुतलेल्या रताळ्याची साल काढून बारीक तुकडे करा. कढईमध्ये तूप गरम करून त्यात रताळ्याचे तुकडे ४ ते ५ मिनिट खमंग परतवून घ्या. त्यानंतर त्यावर झाकण ठेवून वाफ काढून घ्या. रताळ शिजल्यानंतर त्यात वाटीभर दूध घालून रताळी मॅश करा. नंतर त्यात साखर आणि वेलची पावडर घालून व्यवस्थित मिक्स करा. १ वाफ आल्यानंतर त्यात जायफळ पावडर आणि सुका मेवा टाकून व्यवस्थित मिक्स करून घ्या. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेला रताळ्याचा हलवा. हा पदार्थ देवीच्या नैवेद्यासाठी किंवा उपवासाच्या दिवशी नाश्त्यात सुद्धा खाऊ शकता.

# व्ही एस पँथर्सच्या शाखेचे महाळंगी येथे अनावरण युवकांनी व्ही एस पँथर्स मध्ये सामील व्हावे - जिल्हाध्यक्ष शरद किणीकर

चाकूर : व्ही एस पँथर्स चे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके आणि प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिनभाऊ मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष शरद किनीकर आणि तालुकाध्यक्ष वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली गाव तिथे शाखा या अभियानांतर्गत चाकूर तालुक्यातील महाळंगी या गावांमध्ये शाखेचे अनावरण जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी गावामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले त्यानंतर भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमा चे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांनी युवकांना आव्हान केले की युवकांनी व्ही एस पँथर्स मध्ये सामील होऊन सामाजिक प्रश्नांची सोडवणूक करून घ्यावी तसेच अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढा उभारावा. या शाखेच्या उभारणी साठी तालुकाध्यक्ष अजय वाघमारे यांनी परिश्रम घेतले. या शाखा अनावरण समारोहाला जिल्हा उपाध्यक्ष कुलदीप कांबळे




चाकूर शहराध्यक्ष विक्रम कांबळे शहर उपाध्यक्ष शादुल शेख वाहतूक आघाडी तालुकाध्यक्ष नितीन शिंदे लक्ष्मण निलंगे सिद्धार्थ किनीकर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी शाखेवरील पदाधिकारी शाखाध्यक्ष समाधान गायकवाड तालुका उपाध्यक्ष संतोष भालेराव राज सय्यद सचिन हनुमंते अविनाश गोडबोले आदिनाथ हनुमंते नारायण हनुमंते अलाउद्दीन सय्यद उमाकांत गायकवाड प्रेम सागर कांबळे अमोल गोडबोले गजानन गायकवाड सोमनाथ संमुखराव संमुखराव ज्ञानेश्वर संमुखराव शंकर कांबळे शिवाजी सुरवसे सचिन गायकवाड प्रदीप कांबळे दयानंद समुखराव, रत्नपाल टेकाळे स्वप्निल जोगदंड शिवशंकर कांबळे सोहेल शेख जयचंद कांबळे बाळू स्वामी सह गावातील ग्रामस्थ उपस्थित होते.

# राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने अभय सोनकांबळे यांचा सत्कार

लातूर : लातूर जिल्हा राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या वतीने स्वराज्य नगर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक अनिल सोनकांबळे यांचे सुपुत्र अभय सोनकांबळे यांचा हैद्राबाद येथील मेडिकल कॉलेज ला प्रवेश झाल्याबद्दल शाल पुष्पगुच्छ आणि गुरु रविदासाचे चरित्र पुस्तक देऊन सत्कार करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देण्यात आल्या तसेच यावेळी आई ग्रामविकास अधिकारी श्रीमती पुनम घाडगे वडील शिक्षक अनिल सोनकांबळे यांचा देखील शाल पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला यावेळी राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे



जिल्हाध्यक्ष रवी कुरील आदर्श शिक्षक समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष साईनाथ तोटावाड राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे औसा तालुका कार्याध्यक्ष अनिल कांबळे उपक्रमशील शिक्षक अशोक जाधव हे उपस्थित होते.

# औसा नगरपालिके मार्फत होणाऱ्या विकास कामाच्या नावाखाली बोगस कामाला आधार कुणाचा - अक्षय धावारे

औसा/ प्रतिनिधी :- औसा नगरपालिका मार्फत शहरांत विविध विकास कामे चालू आहेत परंतू विकास कामाच्या नावाखाली बोगस काम चालू असल्याचे भिम आर्मी चे तालूका अध्यक्ष सिध्दार्थ कांबळे व त्यांच्या टीम ने नगरपालिका मुख्यधिकारी यांना दि १०/१०/ २०२५ रोजी निवेदन देऊन निर्दर्शनास आणून दिले होते व संबंधित इंजिनियर, तसेच गुतेदार यांच्यावर कारवाई ची मागणी केली होती एक महिना उलटला तरी अद्याप कार्यवाही झालेली नाही म्हणून दि ०३/११/२०२५ रोजी पासून भिम आर्मी भारत एकता मिशन च्या माध्यमातून औसा नगरपालिका समोर तालुका संघटक सुनील जोगदंड हे आमरण उपोषणाला बसले आहेत या उपोषणात कडघर गल्लीतील रस्ता हा दुबारा करण्यात यावा तसेच औसा येथील आमदार अभिमन्यू पवार यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णआकृती पुतळा बसवण्यात येईल आसे आश्वासन दोन वर्षांपूर्वी दिलेले होते ते आद्याप पुर्ण झाले नसून या सर्व मागण्या तात्काळ मागण्या कराव्यात उपोषण कर्त्यांच्या जिवाला काही बरे वाईट झाले तर त्याची सर्व जबाबदारी स्थानिक चे आमदार अभिमन्यू पवार इंजिनिअर गुत्तेदार व या बोगस कामामध्ये सहभागी असलेला प्रत्येक अधिकारी हा जबाबदार




असेल असा इशारा या उपोषणस्थळावरून अक्षय धावारे यांनी दिला या वेळी मागण्यासाठी भिम आर्मी मराठवाडा निरीक्षक अक्षय धावारे जिल्हा अध्यक्ष विलास चक्रे जिल्हा कार्याध्यक्ष बबलू गवळे जिल्हा संघटक सोनू घोडके , भिम आर्मी जिल्हा संघटक समाधान कांबळे तालुका अध्यक्ष सिद्धार्थ कांबळे शहर अध्यक्ष मुज्जू शेख,भिम आर्मी खरोसा सरखाल प्रमुख प्रकाश अवचारे वंचितचे तालुका अध्यक्ष शिवाजी कुंभार, वंचित शहर अध्यक्ष सद्दाम पठाण शहर महासचिव वंचित इलीयस चौधरी मोतीराम मामा कांबळे आदी पदाधिकारी उपस्थित होते...

# समाज भूषण पुरस्कार प्राप्त सुरेश सोनवणे यांचे ह्रदयविकाराच्या धक्क्याने निधन

लातूर :- पोलीस खात्यातील माजी कर्मचारी राज्य शासनाचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त सुरेश यशवंत सोनवणे यांचे रविवार,दिनांक २ नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ह्रदविकाराच्या झटक्याने खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असताना निधन झाले.सायंकाळी मारवाडी स्मशानभूमीत त्यांना अखेरचा निरोप देण्यात आला.त्यांच्या पश्चात मुलगा,सून,मुलगी,नातवंडे असार परिवार आहे.बुधवारी त्यांच्या निवासस्थानी भोजनदान होणार आहे.



अंत्यविधीनंतर त्यांना अनेक मान्यवरांनी शब्दांजली अर्पण केली.भंते पय्यानंद यांनी सुरेश सोनवणे काका यांनी आपल्या कसबे तडवळा या जन्म गावी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १९४१ ला ऐतिहासिक महार-मांग परिषद झाली होती,त्याची आठवण म्हणून आपल्या स्वतःच्या मालकीची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा क्रांतीस्तंभ उभारण्यासाठी दान करुन त्याच्या उभारणीसाठी शासन,प्रशासन आणि न्यायालयीन पातळीवर संघर्ष केला.त्यांची ही क्रांतीस्तंभ उभारण्याची लढाई अर्धवट राहिली ती पूर्ण करणे हीच त्यांनी खरी आदरांजली ठरेल,असे सांगून त्यासाठी समाजाने पुढे यावे असे आवाहन केले.गांधी चौक पोलीस ठाण्याचे एपीआय आर.आर.करे यांनी पोलीस खात्याच्यावतीने पुष्पहार वाहून आदरांजली अर्पण केली.

याप्रसंगी माजी उपनगराध्यक्ष मोहन माने,रिपाइंचे मराठवाडा सचिव अशोकराव कांबळे,प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे, अशोकराव कांबळे,एस.एम.गायकवाड,प्राचार्य सुहास सरवदे,डॉ.बाबासाहेब आंबेकडकर लॉयर्स लिगचे ॲड.शिवकुमार बनसोडे यांनीही आपल्या शोकभावना व्यक्त केल्या..

या प्रसंगी चंद्रकांत चिकटे,बाबुराव धुळे, प्रा.डॉ.यु.टी.गायकवाड, ॲड. ठाकूरमामा,मिलींद कांबळे, तानाजी सोनवणे, ॲड.गायकवाड, भूजंग कांबळे,मच्छिंद्र बलांडे, भगवान वाघमारे, पी.जी.सुर्यवंशी, ॲड.पंजाबराव सितापूरे, उदय सोनवणे, ह्रदय सोनवणे, कॉ.विश्वंभर भोसले, बाबा गायकवाड, ॲड.सचिन कांबळे, बालाजी आल्टे, सौदागर सवई,दिलीप कांबळे, रमेश कांबळे, दादासाहेब सोनवणे, बालाजी सोनवणे, सरपंच विशाल जमाले, कोरबू मस्जीद, गौतम बुक्तर, मिलींद भालेराव, सिध्दार्थ भालेराव यांच्यासह विविध स्थरातील स्नेही उपस्थित होते.

# ट्रम्पच्या टॅरिफ वॉरचा भारतावर मोठा परिणाम ; रशियन तेलाच्या पुरवठ्यात लक्षणीय घट

ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात रशियाकडून भारतात कच्च्या तेलाच्या निर्यातीत घट झाली. अमेरिकेने रशियन तेल कंपन्यांवर बंदी घातल्यानंतर ही घसरण झाली. अमेरिकेने अलीकडेच प्रमुख रशियन तेल कंपन्या रोसनेफ्ट आणि लुकोइलवर निर्बंध लादले. या निर्बंधांनंतर, रशियाकडून भारतात पाठवल्या जाणाऱ्या कच्च्या तेलाच्या प्रमाणात लक्षणीय घट झाली आहे. २२ ऑक्टोबर रोजी अमेरिकेने निर्बंध जाहीर केल्यानंतर ही घसरण सुरू झाली. मात्र, ऑक्टोबरचे एकूण चित्र काहीसे वेगळे आहे.

केप्लरने जाहीर केलेल्या शिप ट्रॅकिंग डेटानुसार, २७ ऑक्टोबर रोजी संपलेल्या आठवड्यात रशियाने भारताला दररोज सरासरी १.१९ दशलक्ष बॅरल कच्च्या तेलाची निर्यात केली. मागील दोन आठवड्यांपेक्षा ही घसरण लक्षणीयरीत्या कमी आहे, जेव्हा हा आकडा दररोज १.९५ दशलक्ष बॅरल होता. ही घसरण प्रामुख्याने रोसनेफ्ट आणि लुकोइलकडून होणाऱ्या तेल पुरवठ्यात घट झाल्यामुळे आहे. या दोन्ही कंपन्या रशियाच्या तेल उत्पादन आणि निर्यातीपैकी निम्म्याहून अधिक वाटा उचलतात. त्यांनी पूर्वी भारताच्या तेल पुरवठ्यापैकी दोन तृतीयांश भाग पुरवला होता.

कंपन्यांनी निर्यात कमी केली २७ ऑक्टोबर रोजी संपलेल्या आठवड्यात, रशियाची सर्वात मोठी तेल कंपनी, रोझनेफ्टची भारतात होणारी निर्यात प्रतिदिन ०.८१ दशलक्ष बॅरलपर्यंत घसरली, जी मागील आठवड्यात १.४१ दशलक्ष बॅरल प्रतिदिन होती. दरम्यान, लुकोइलने या आठवड्यात भारतात कोणतेही तेल पाठवले नाही, जे मागील आठवड्यात ०.२४ दशलक्ष बॅरल प्रतिदिन होते. ही घट समजण्यासारखी आहे कारण रशियन कच्चे तेल सुएझ कालव्याद्वारे भारतीय बंदरांपर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे एक महिना लागू शकतो.

अमेरिकेने दोन्ही रशियन कंपन्यांना त्यांचे करार पूर्ण करण्यासाठी २१ नोव्हेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. म्हणूनच, भारतीय बंदरांवर रशियन तेलाची डिलिव्हरी २१ नोव्हेंबरपर्यंत सामान्य राहण्याची अपेक्षा आहे. ऑक्टोबरमध्ये भारतात होणारी डिलिव्हरी देखील चांगली होती, कारण तेल निर्बंध लादण्याच्या काही आठवड्यांपूर्वी ती अंतिम करण्यात आली होती. संपूर्ण ऑक्टोबर महिन्याचे आकडे वेगळे संपूर्ण ऑक्टोबर महिन्याचे आकडे काही वेगळे दिसतात. शिप ट्रॅकिंग डेटानुसार, ऑक्टोबरमध्ये रशियाकडून होणारी तेल आयात प्रतिदिन अंदाजे १.४८ दशलक्ष बॅरल (bpd) होती. सप्टेंबरमधील १.४४ दशलक्ष बॅरल प्रतिदिनपेक्षा हे थोडे जास्त आहे. २०२२ मध्ये मॉस्कोने युक्रेनवर केलेल्या आक्रमणानंतर, भारत समुद्रमार्गे रशियन कच्च्या तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार म्हणून उदयास आला.

## गरुड चौक ते पिंटू हॉटेल परिसरात कायमस्वरूपी पोलीस मदत केंद्र व वाहतूक पोलीस नियुक्तीची पूर्वभाग कृती समितीची मागणी

लातूर: -लातूर शहराच्या पूर्व भागात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे आणि वाहतूक विस्कळीततेमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर लातूर शहर पूर्व भाग नागरी कृती समितीने गरुड चौक तेपिंटू हॉटेल परिसरात कायमस्वरूपी पोलीस मदत केंद्र उभारणीसह वाहतूक पोलीस नियुक्त करण्याची मागणी जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पिंटू हॉटेल ते गरुड चौक या परिसरात अलिकडेच धारदार शस्त्रासह युवकांमध्ये झालेल्या मारामारीनंतर स्थानिक नागरिकांत असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. तसेच ३६१ क्रमांकाच्या महामार्गाच्या विकसित रस्त्यामुळे वाहनांची वर्दळ मोठ्या प्रमाणात वाढली असून सिग्नल बंद असल्याने वाहतूक गोंधळ आणि अपघाताचे प्रमाणही वाढत आहे.नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि वाहतूक शिस्तीच्या अंमलबजावणीसाठी गरुड चौकात वाहतूक पोलीस कायमस्वरूपी तैनात करावेत तसेच पिटु हॉटेल परिसरात पोलीस मदत केंद्र स्थापन करावे, अशी मागणी कृती समितीने केली आहे. सदर निवेदनावर समितीचे अध्यक्ष दीपक गंगणे, सचिव बाबासाहेब बनसोडे, कमलाकर कांबळे, भगवेश्वर धनगर, दत्ता मामडगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मी खेळाडू आहे पण जंगली रमीचा नाही तर ‘कबड्डीचा’; भाजपात जाताच उदय सांगळेंनी कोकाटेंवर साधला निशाणा

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नाशिक जिल्ह्यातील राजकीय समीकरणे बदलताना दिसत आहेत. भाजपने येथे मोठी राजकीय खेळी केली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून विधानसभा निवडणूक लढवलेले सिन्नरचे उदय सांगळे यांनी भाजपात पक्ष प्रवेश केला आहे. यानंतर नाशिकच्या राजकारणात महायुतीमधील मित्रपक्ष असलेल्या अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला शह देण्याचा प्रयत्न केला असल्याची जोरदार चर्चा होत आहे. नुकतेच उदय सांगळे यांनी आपल्या हाती कमळ घेतले असून भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि मंत्री गिरीश महाजन यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांनी पक्षप्रवेश केला आहे. भाजपात पक्ष प्रवेश करताच उदय सांगळे यांनी राष्ट्रवादीचे माजी कृषीमंत्री आणि सध्याचे विद्यमान क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर निशाणा साधला आहे.



मी खेळाडू आहे पण जंगली रमीचा नाही तर कबड्डीचा असे म्हणत उदय सांगळे यांनी माणिकराव कोकाटे यांना डिवचण्याचा प्रयत्न केला आहे. सिन्नरमध्ये पाणी प्रश्न आणि तर समस्या कायम आहेत यावर त्यांनी नाराजी व्यक्त करत कोकाटे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. त्यांनी केलेल्या टीकेवरून सिन्नरचे राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

कोण आहेत उदय सांगळे? गेली सिन्नर विधानसभेची निवडणूक उदय सांगळे यांनी शरद पवार यांच्या राष्ट्रवादीकडून लढवली होती. याच मतदार संघातून राष्ट्रवादी अजित पवार पक्षाचे क्रीडामंत्री माणिकराव कोकाटे विजयी झालेले आहेत. सांगळे हे अगोदर उद्धवसेनेत होते. विधानसभेच्या निवडणुकीच्या वेळी उदय सांगळे यांनी खासदार राजाभाऊ वाजे यांनी माणिकराव कोकाटे यांना छुप्या पद्धतीने मदत केल्याचा आरोप केला होता. त्यामुळेच त्यांचा पराभव झाला होता, असेही ते म्हणाले होते.

उदय सांगळे आणि दिंडोरीच्या सुनीता चारोस्कर यांनी भाजपात जाण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे नाशिकमधील राजकीय समीकरणे बदलणार असल्याचे बोलले जात आहे. भाजप राज्यात ठिकठिकाणी आपली ताकद वाढवताना दिसत आहे. सांगळे आणि चारोस्कार या दोघांचा पक्षप्रवेश नुकताच पार पडला. दोघांनीही त्यांच्या शेकडो समर्थकांसह आपल्या हाती कमळ घेतले आहे.

# बारामतीमधून मोठी बातमी समोर; अजित पवारांच्या धाकट्या सुपुत्राची राजकारणात एन्ट्री?

सध्या बारामतीचे राजकारण चर्चेचा विषय बनले आहे. याचे कारण म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी बारामती तालुकाध्यपदी नव्या चेहऱ्याला संधी दिली आहे. अजित पवार यांचे अत्यंत विश्वासू आणि निष्ठावान कार्यकर्ते म्हणून ओळखले जाणारे संदीप कृष्णराव बांदल यांची तालुकाध्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. यामुळे आगामी काळात पक्ष संघटनेत मोठे बदल करण्यात येणार असल्याचे संकेत यामुळे मिळत आहेत. या सगळ्या चर्चा सुरू असतानाच बारामतीमधून एक मोठी बातमी समोर आली आहे.



बारामती नगरपरिषद नगराध्यक्ष पदाच्या निवडणुकीवरून राजकीय वर्तुळात मोठी चर्चा सुरू झाली असून उपमुख्यमंत्री अजित यांचे धाकटे सुपुत्र जय पवारांना राजकारणात एन्ट्री होणार असल्याची जोरदार चर्चा होत आहे. ३१ जानेवारीपर्यंत राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिलेले आहेत. यामुळे निवडणूक आयोगाकडून जोरदार तयारी केली जात असून, येत्या काही दिवसांत निवडणुकांच्या तारखा आणि आचारसंहिता कधी लागणार याबाबत माहिती येवू शकते. तसेच गेल्या काही दिवसांपूर्वी राज्यातील नगराध्यक्षपदासाठीची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. बारामती नगरपरिषदेचे नगराध्यपद खुल्या प्रवर्गासाठी असल्याने यासाठी अनेक इच्छुक नावे समोर येत असताना आता थेट अजित पवार यांचे धाकटे सुपुत्र जय पवार यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. नगराध्यपदासाठी अनेकजण इच्छुक आहेत. यामुळे मोठा संघर्ष निर्माण होऊ शकते. या संघर्षाला अटकाव घालण्यासाठी अजित पवार यांच्याकडून जय पवार यांचे नाव नगराध्यक्षपदासाठी पुढे केले जाण्याची शक्यता आहे. मात्र, अद्याप याबाबत अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

नवीन प्रभाग रचनेनुसार बारामती नगरपरिषदेसाठी ४१ नगरसेवक निवडून जाणार असून, नगराध्यक्षपदासाठी जय पवारांचे नाव पुढे आल्यास बारामतीच्या राजकारणात मोठी राजकीय घडामोड ठरली जाणार आहे. यामुळे आता अजित पवार लवकरच धक्कातंत्र देणार असल्याची जोरदार चर्चा बारामतीच्या स्थानिक राजकारणात सुरू झाली आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.